MHYA100010952022

दाखल तारीखः ३०/०६/२०२२
नोंदणी तारीखः ३०/०६/२०२२
निकाल तारीखः ०४/०७/२०२६
**कालावधीः ०४व. ००म. ०४दि.**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्या.क्र. ०१) केळापूर, जि. यवतमाळ यांचे न्यायालयात**
**( एफ.के.सिद्दीकी यांचे समक्ष )**
**( एमएचबीएच–२४९९ )**

**नियमीत फौजदारी खटला क्रं. १०४/२०२२**

**निशाणी क्र. ३४**

प्रथम खबर अहवाल क्रमांक :– ४०९/२०२२, दि. ३०/०३/२०२२

पोलीस ठाणे :– पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

दोषारोप :– भारतीय दंड विधान, १८६० कलम ४९८–अ,३२३,
५०४ सहकलम ३४ अन्वये.

**महाराष्ट्र शासन तर्फे –**
पोलीस ठाणे, पांढरकवडा,
ता. केळापूर, जि. यवतमाळ. **.....अभियोग पक्ष**

श्री. पी. एस. गजभिये– सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

// विरुध्द//

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Date: 2026.07.04 15:28:24 +0530

**१. हंसराज वसंता सिडाम**

वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजूरी,

**२. पंचशिला वसंता सिडाम**

वय – ३४ वर्षे, व्यवसाय – मजूरी ,

**३. बजुबाई वसंता सिडाम**

वय – ६५ वर्षे, व्यवसाय – मजूरी ,

सर्व राहणार– वारा कवठा, ता. केळापूर, जि. यवतमाळ .....**आरोपी**.....

श्री. ए. आर. काळे – विधीज्ञ आरोपीतर्फे.

| | | |
|---|---|---|
| घटना घडल्याची तारीख | :– | १४/०७/२०१३ ते ३०/०३/२०२२ पर्यंत |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | :– | ३०/०३/२०२२ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | :– | ३०/०६/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | :– | १५/०६/२०२६ |
| साक्षीपुरावे आरंभ झाल्याची तारीख | :– | २३/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता प्रकरण ठेवल्याची तारीख | :– | ०३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची तारीख | :– | ०४/०७/२०२६ |

## (आरोपीचा तपशील)

| अ.क्र. | आरोपीची नावे | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपीत कलमे | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | कलम ४२८ च्या उद्देश्याने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| आ.क्र. १ ते ३ | वरीलप्रमाणे | -- | १८/११/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | लागू नाही. |

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Date: 2026.07.04 15:28:35 +0530

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी.**

**अ. अभियोग पक्ष.**

| क्रमांक | साक्षीदारांची नावे | तपशील |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | सौ. कोमल हंसराज सिडाम | प्रथम खबरी |

**ब. बचाव पक्ष, क. न्यायालयीन साक्षीदारः– काही नाही.**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन निशाणी यादी.**

**अ. अभियोग पक्ष, ब. बचाव पक्षाने मान्य केलेले कागदपत्र, क. न्यायालयीन निशाणीः– निरंक**

**ड. महत्त्वाची वस्तु – निरंक**

**दोषारोप – भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८–अ,३२३,५०४,५०६ सहकलम ३४ प्रमाणे.**

**न्या य नि र्ण य**

(निकाल दि. ०४ जुलै, २०२६)

**१.** प्रस्तुत प्रकरण हे आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ,३२३,५०४ सहकलम ३४, प्रमाणे दाखल करण्यात आले आहे. (यापुढे संक्षिप्तपणे भा.दं.वि. असे संबोधण्यात येईल.)

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे –**

**२.** अभियोग पक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की, प्रथम खबरी सौ. कोमल हंसराज सिडाम (यापुढे संक्षिप्तपणे 'प्रथम खबरी' असे संबोधण्यात येईल.) यांचे आरोपी क्र. १ ते ३ (यापुढे संक्षिप्तपणे 'आरोपी क्र. १ ते ३' असे संबोधण्यात येईल.) हे अनुक्रमे पती, ननंद व सासु

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Date: 2026.07.04 15:28:46 +0530

आहेत. प्रथम खबरी व आरोपी क्र. ०१ यांचा विवाह दि. १४/०७/२०१३ रोजी संपन्न झाला. लग्नानंतर आरोपी क्र. ०१ ते ०३ यांनी प्रथम खबरीस लहानसहान कारणांवरुन शिवीगाळ करुन तिचा छळ करुन तिला मारहाण केली. तुला मुलीच आहेत, तु पांढ-या पायाची आहे, या व इतर कारणांवरुन तिचा छळ करण्यात येत होता. दि. २१/१२/२०२० रोजी प्रथम खबरीने आरोपी क्र. ०१ विरुध्द महिला तक्रार निवारण कक्ष, यवतमाळ येथे तक्रार दिल्याने त्यांच्यामध्ये कमेट घडून आला. त्यानंतर देखील काही दिवस चांगले वागविल्यानंतर आरोपी क्र. ०१ हा तिच्या चरित्रावर संशय घेवून माहेरहून पन्नास हजार रुपये आण या कारणावरुन तिचा छळ करीत असे.

**३.** दि. २८/०३/२०२२ रोजी आरोपी क्र. ०१ ने प्रथम खबरीस दारुच्या नशेत शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण केली. दि. ३०/०३/२०२२ रोजी १०.०० वाजेच्या सुमारास आरोपी क्र. ०१ ते ०३ यांनी प्रथम खबरीस शिवीगाळ करुन तिला मारहाण केली. शेवटी प्रथम खबरीने सदर घटनेची तक्रार पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे दि. ३०/०३/२०२२ रोजी दिली.

**४.** सदर घटनेच्या दिलेल्या प्रथम खबरवरुन पांढरकवडा, ता. केळापूर पोलिसांनी आरोपींविरुध्द गु.र.क्रं. ४०९/२०२२ प्रमाणे भा.दं.वि. चे कलम ४९८-अ,३२३,५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. त्याचा तपास नापोकॉ राम राजुसिंग राठोड यांच्याकडे देण्यात आला. तपासाअंती त्यांनी न्यायालयामध्ये निशाणी क्र. १ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले.

**५.** **<u>दोषारोप व आरोपीचे म्हणणे</u>** – मी आरोपींविरुध्द वर नमुद कलमान्वये

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.04 15:29:04 +0530

(नि.क्र.२१) प्रमाणे आरोप निश्चित केले. आरोपींनी (नि.क्र.२२ ते २४) प्रमाणे आरोप नाकबुल केले. आरोपींविरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा न आल्याने त्याचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अंतर्गतचे बयाण वगळण्यात आले.

६. **मुद्दे व निष्कर्ष** – सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी. एस. गजभिये व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. आर. काळे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याच्या न्यायीक निकालासाठी उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | दिनांक १४/०७/२०१३ ते ३०/०३/२०२२ रोजी पर्यंत मौजा वारा कवठा ता. केळापूर, जि. यवतमाळ येथे आरोपींच्या राहते घरी आरोपी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्नसनार्थ प्रथम खबरीच्या हिला माहेरुन पैसे घेवून ये नाही तर तू कामाला जा, तुला काय फुकट पोसायचे काय, तसेच आरोपी क्र. ०१ हा तुझा आईवडिलांनी होन्डा दिला नाही, लग्नात एकही पैसे दिले नाही, तू माहेर वरुन रुपये ५०,०००/– आण या व इतर कारणावरुन मारपिट करुन प्रथम खबरीचा शारिरीक व मानसिक छळ केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ...नाही. |
| २ | दि. ३०/०३/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास वर नमुद ठिकाणी आरोपी क्र. १ यांनी आरोपी क्र. २ व ३ यांच्यासोबत त्यांच्या समान हेतुच्या पुर्नसनार्थ प्रथम खबरीस मारहाण करुन साधी दुखापत पोहचवली हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ...नाही. |

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.04 15:29:15 +0530

| | | |
|---|---|---|
| ३ | वर नमुद दिवसी वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या समान हेतुच्या पुर्नसनार्थ प्रथम खबरीकडुन सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा अपराध घडवा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन त्यांचा अपमान करून त्यांना प्रक्षोभित केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ...नाही. |
| ०४ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## // कारणमिमांसा //

**मुद्दा क्रं. ०१ ते ०३ बाबत** –

**७.** मुद्दा क्रं. १ ते ३ हे एकाच पुराव्यावर अवलंबुन असल्यामुळे त्यांना विवेचनाकरिता मी एकत्रीतरीत्या घेत आहे.

८. या खटल्यातील प्रथम खबरी कोमल (सा.क्र.१) यांनी आपल्या सरतपासादरम्यान कथन केले की, त्या न्यायालयात हजर आरोपींना ओळखत असून आरोपी क्र. ०१ ते ०३ हे अनुक्रमे त्यांचे पती, ननंद व सासू आहे. घटना अंदाजे दोन ते तीन वर्षापूर्वी घडल्याचे कथन करुन सन २०१३ मध्ये त्यांचे लग्न आरोपी क्र. ०१ सोबत झाले होते व लग्नानंतर त्यांच्या व आरोपी क्र. ०१ यांच्या मध्ये वादविवाद झाल्याचे कथन केले. त्यांनी पुढे असे कथन केले की, शेवटचा वादविवाद दोन वर्षापूर्वी झाल्याने त्यांनी रागाच्या भरात पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून या व्यतिरीक्त इतर काही घडले नसुन त्या पोलीस स्टेशनला गेल्याचे आणि तेथे तक्रार दिल्याचे त्यांनी कथन केले. त्याने अभिलेखावरील प्रथम खबर व प्रथम खबर अहवालाच्या छापिल प्रत यावरील त्याच्या सह्या अनुक्रमे (निशाणी क्र. ३० ते ३२) प्रमाणे ओळखल्या असून त्यातील

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.04 15:29:42 +0530

मजकुराबाबत त्याला काही लक्षात नसल्याचे कथन करुन पोलीसांनी त्यांचे बयान घेतले नसल्याचे त्यांनी कथन केले.

९. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये देखील त्यांनी प्रथम खबर व त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित 'भाग–अ, ब' बाबत त्यांना काही एक माहित नसल्याचे कथन केले आहे. पुढे त्यांनी हे देखील मान्य केले की, आरोपींन सोबत असलेल्या त्यांचा वाद न्यायालयाबाहेर समोपचाराने मिटलेला असून त्याला आरोपींच्या विरुध्द सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही तसेच इतर साक्षीदार देखील तपासायचे नाही. याव्यतिरिक्त विचारण्यात आलेल्या सुचनावजा प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तरे दिली आहेत. बचाव पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास नाकारण्यात आला.

१०. प्रथम खबरी यांनी पुरसिस (नि.क्र. २९) प्रमाणे सादर करून त्यांना प्रकरणात कोणतेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे नमुद केले. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन करून आज रोजी (नि.क्र.१) वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

११. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रथम खबरी व आरोपी यांच्या दरम्यान असलेला वाद न्यायालयाबाहेर मिटल्यामुळे तिने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. तपासी अंमलदार यांनी आरोपीविरुध्द भरपूर पुरावा मिळून आल्याने न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले आहे. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केला ही बाब नाकारता येत नाही. याउलट बचाव पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आरोपींनी

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Date: 2026.07.04 15:29:54 +0530

सदरचा गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने निर्विवादपणे सिध्द केली नाही. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**१२.** एकंदरीत उभय पक्षाच्या युक्तिवादाचे पार्श्वभुमीवर अभिलेखावरील मौखीक पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्याइतपत कोणताही पुरावा अभिलेखावर आणण्यात आला नाही. आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी प्रथम खबरी कोमल (सा.क्र.१) यांची साक्ष महत्वाची होती. परंतु त्यांनी आपली साक्ष अत्यंत मोघमपणे सादर केली. प्रथम खबरीने प्रथम खबर मधील मजकूर सिध्द केला नाही. एकंदरीत अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याइतपत पुरेसा नाही. आरोपी क्र. ०१ ते ०३ हे प्रथम खबरीचे अनुक्रमे पती, ननंद व सासु असल्याचे व त्यांच्या दरम्यान असलेला वाद न्यायालयाबाहेर सामोपचाराने मिटला असल्याचे अभिलेखावर आले आहे. कदाचित या कारणामुळे प्रथम खबरीने अभियोग पक्षास सहाय्य केले नसावे.

**१३.** एकंदरीत संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द केले नाही. त्यामुळे मी अभियोग पक्षाच्या युक्तिवादाशी सहमत नाही. संशयाचा फायदा हा नेहमी आरोपींच्या पक्षामध्ये जातो हे तत्व परत एकदा सरस ठरल्याचे दिसून येते. सबब, अभिलेखाचे एकंदरीत अवलोकन केले असता मी या निष्कर्षाप्रती येऊन पोहोचलो आहे की, आरोपी क्र. १ ते ३ हे या खटल्यातून निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. प्रकरणाचे स्वरुप पाहता आरोपींकडुन कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिते अन्वये प्रत्येकी रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामिन घेणे

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.04 15:30:12 +0530

उचित राहील. सबब, मी मुद्दा क्र. ०१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ०४ च्या उत्तरा दाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) आरोपी क्र. १ ते ३ यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८–अ,३२३,५०४ सहकलम ३४ मधुन फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचे जामीन व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३) आरोपी क्र. १ ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया सांहिता, १९७३ चे कलम ४३७–अ नुसार प्रत्येकी रुपये १५०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामिन दयावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात न्यायासनावर घोषित करण्यात आला).

FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.04 15:30:19 +0530

दिनांक – ०४/०७/२०२६.

(एफ. के. सिद्दीकी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
केळापूर

# ::Certificate::

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. R. Gulhane |
| Court Name | : | J.M.F.C. Court, Kelapur |
| Date | : | 04/07/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 04/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 04/07/2026 |